महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर
चित्रपट निर्मिती करण्यास तसेच त्यासाठी
होणाऱ्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. मावज-२०१३/१४३/३४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ०९ मार्च, २०१८

वाचा : १) शासन निर्णय क्र.मावज २००१/६७७/७७/२००१/३४, दिनांक १५ मार्च, २००३.

प्रस्तावना :-

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित पूर्ण लांबीचा चित्रपट निर्माण करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. व त्याच अनुषंगाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये त्यास शासन मंजूरी देण्यात आली होती. या चित्रपट निर्मितीची जबाबदारी राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाकडे सोपविण्यात आली होती. तथापि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाने या प्रकरणी लावलेला विलंब लक्षात घेता हा चित्रपट विशिष्ट कालावधीमध्ये पूर्ण करण्यासाठी खुल्या बाजारातून ई-निविदा मागवून योग्य संस्थेची निवड करुन त्या संस्थेमार्फत चित्रपटाच्या निर्मितीचे काम पूर्ण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

१) महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपट निर्मितीची जबाबदारी राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाकडे सोपविण्या संदर्भातील संदर्भाधीन दि.१५ मार्च, २००३ चा शासन निर्णय रद्द करण्यांत येत आहे.

२) महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपट निर्माण करण्याकरिता खुल्या बाजारातून ई-निविदा प्रक्रिया राबवून चित्रपट निर्माण करुन त्याचे वितरण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. चित्रपट निर्मितीचा संपूर्ण खर्च राज्य शासनाकडून करण्यात येईल.

३) चित्रपटाची निर्मिती ऐतिहासिक सत्याला धरुन होत असल्याची खात्री करणे, निर्मिती प्रक्रियेवर देखरेख ठेवणे यासाठी तज्ञ जाणकारांची समिती विभागाकडून गठीत करण्यांत येईल.

४) प्रस्तुत चित्रपट निर्मितीसाठी येणारा खर्च मागणी क्रमांक ए-६, प्रधानशीर्ष क्र.२२२०-माहिती व प्रसिध्दी-०१ चित्रपट१०५-चित्रपटाची निर्मिती-(००)(०१) चित्रपटांची निर्मिती संगणक संकेतांक (२२२० ०३८४) या लेखाशीर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५) हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५६७/२०१७ व्यय-४, दिनांक १५.१२.२०१७ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०९१७४२३९५७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2018.03.09 17:44:43 +05'30'

(रा. ना. मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) सचिव, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
५) सर्व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
६) मा.राज्यमंत्री (सा.प्र.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता)(लेखापरीक्षा), मुंबई, नागपूर,
८) उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
११) लेखाधिकारी (आहरण व संवितरण), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१२) निवडनस्ती (का.३४), सामान्य प्रशासन विभाग.